रविवार दि.२७ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ५३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६


जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक बीड लोकनेता
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# उद्धव ठाकरे गटाची दुसरी यादी जाहीर:१५ उमेदवारांचा समावेश

## गोटे, राजू तडवी,जामसुतकर यांना संधी



### शिवसेनेची उमेदवारांची यादी

धुळे शहर– अनिल गोटे
चोपडा – राजू तडवी
जळगाव शहर– जयश्री सुनील महाजन,
बुलडाणा– जयश्री शेळके,
दिग्रस– पवन श्यामलाल जयस्वाल
हिंगोली– रूपाली राजेश पाटील
परतूर– आसाराम बोराडे
देवळाली – योगेश घोलप
कल्याण पश्चिम– सचिन बासरे
कल्याण पूर्व – धनंजय बोडारे
वडाळा– श्रद्धा श्रीधर जाधव
शिवडी– अजय चौधरी
भायखळा– मनोज जामसुतकर
श्रीगोंदा– अनुराधा राजेंद्र नागावडे
कणकवली– संदेश भास्कर पारकर.
उद्धव ठाकरे ९० जागांवर उमेदवार देणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या वतीने १५ उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये धुळे शहर विधानसभा मतदारसंघातून अनिल गोटे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर चोपड्यातून राजू तडवी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर शिवसेनेसाठी महत्त्वाचा मनला जाणारा भायखळा मतदारसंघात मनोज जामसुतकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

उद्धव ठाकरे गटाच्या पहिल्या उमेदवार यादीत ६५ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली होती. आता आणखी १५ उमेदवार उभे करून पक्षाने एकूण ८० जागांसाठी नावे निश्चित केली आहेत. महाविकास आघाडीचा फॉर्म्युला आधी ८५+८५+८५ असा निश्चित करण्यात आला होता. मात्र, नंतर हा ९०+९०+९० करण्यात आला असून, त्यानुसार उद्धव ठाकरे लवकरच आणखी जागांवर उमेदवारांची नावे जाहीर करू शकतात.२० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात महाराष्ट्रातील २८८ विधानसभा जागांवर मतदान आणि त्यानंतर २३ नोव्हेंबरला मतमोजणी झाल्यानंतर निकाल जाहीर केले जातील. सध्या महायुतीची (म्हणजे भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी) सत्ता आहे. तर यावेळी महाविकास आघाडी (काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार) देखील पुन्हा सत्तेची कमान मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहे. आता जनता यावेळी कोणाचे सरकारला निवडून देते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### आष्टी मतदार संघातून महेबूब शेख यांनी फुंकली तुतारी

# आष्टी तालुक्यात महेबुब शेख यांचे जोरदार स्वागत जेसीबीतुन पुष्पवृष्टी,कार्यकर्तांचा जल्लोष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**



मागिल अनेक दिवसांपासून आष्टी विधानसभा मतदारसंघात तुतारीची उमेदवारी कोणाला मिळणार याविषयी मोठा संभ्रम निर्माण झाला होता.महाविकास आघाडी कडून इच्छुक असणारे जवळपास सर्वच इच्छुक उमेदवार मुंबईला ठाण मांडून बसले होते.परंतु महाविकास आघाडी कडून आष्टी विधानसभा मतदारसंघात महेबुब शेख यांना अखेर तुतारी फुंकण्याची संधी मिळाली आहे.उमेदवारी मिळाल्यानंतर आष्टी विधानसभा मतदारसंघात महेबुब शेख यांचे जोरदार स्वागत करण्यात आले जोरदार घोषणाबाजी करत ढोलताशांच्या गजरात जेसीबीतुन पुष्पवृष्टी करत जल्लोषात महेबुब शेख यांचे स्वागत झाले.

आष्टी विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची अधिकृत उमेदवारी महेबुब शेख यांना यांना काल जाहीर झाल्यानंतर आष्टी येथे कार्यकर्त्यांनी सायंकाळी फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष साजरा करण्यात आला आज सकाळी मतदार संघात महेबुब शेख यांचे सकाळी धानोरा येथे आगमन झाले ढोलताशांच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले त्यानंतर धानोरा येथील चौकाचौकात रॅली काढून महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.कडा येथे ही जोरदार स्वागत झाले आष्टी शहरात स्वागतासाठी जेसीबीतून महेबुब शेख यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली फटाक्यांची आतिषबाजी ढोलताशांच्या गजरात रॅली किनारा चौकापासून साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना चौकात अभिवादन करून झाली पुढे,स्व.गोपीनाथ मुंडे चौकात मुंडे साहेबांना अभिवादन करण्यात आले त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराजांना अभिवादन करण्यात आले आष्टी शहरातील सर्व चौकाचौकात महापुरुषांना अभिवादन करण्यात आले.यावेळी महेबुब भाई तुम आगे बढो हम तुम्हारेसाथ है जोरदार घोषणाबाजी करण्यात आली यावेळी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह होता यावेळी तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके,सुनिल नाथ,विजय गाढवे,राहुल काकडे,दादासाहेब झांजे,दिपक होले,ड रिजवान शेख,डॉ.नदिम शेख,नगरसेवक भिमराव गायकवाड,अंकुश खोटे,जिशान सय्यद,अमोल चव्हाण,भाऊसाहेब मेटे,संतोष सानप,अतुल शिंदे,तौफिक शेख,भैरव चव्हाण,सचिन गोंदकर, सोमनाथ निकाळजे,अंबादास पवार, राजेसाहेब निंबाळकर,सचिन पवार,लहू भवर,शिवाजी शेळके, दत्तात्रय कांबळे,परमान शेख, माऊली कांबळे,सुधाकर भगत, सोहेल बेग,जमीर पठाण, अस्लम मोगल,जल्लाल शेख, हाफिज मोसिम सय्यद,मुजामिल शेख,अरबाज बेग,महम्मद शेख आदी पदाधिकारी,कार्यकर्ते, युवक मोठ्या संख्येने रॅली सहभागी झाले होते.

# मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या कडे शिवश्री सुरेश घोरबांड गुरूजी यांनी मागीतली उमेदवारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | प्रतिनिधी**



लोहा कंधार विधानसभेच्या निवडणूकीचे मतदान येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार असून लोहा तालुक्यातील कलंबर खुर्द येथील शिवश्री सुरेश घोरबांड गुरूजी यांनी मराठा योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या कडे कंधार लोहा विधानसभेची उमेदवारी मागितली असून जरांगे पाटील यांनी तयारीला लागा उमेदवारी आपलीच असून मी दिलेल्या कोणत्याही माणसाला जनता मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.असे आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सुरेश घोरबांड गुरूजी यांनी सांगितले आहे.सुरेश गुरुजी यांचे मराठवाडा स्तरावर कला, साहित्य, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक विविध कार्यात सक्रिय सहभाग असून ते श्री संत योगीराज निवृत्ती महाराज यांची पोथी लिहिणारे घोरबांड महाराज यांचे ते नातू असून त्यांनी श्री संत योगीराज निवृत्ती महाराज व श्री संत मोतीराम महाराज यांचे मंदिर उभारले आहे.धार्मीक कार्याबरोबर मराठा समाजातील मुलामुलींचे विवाह जुळवून देण्यासाठी नेहमी कार्य करतात.२००५ या वर्षी मुंबई येथे आझाद मैदानावर

### झाडे लावा झाडे जगवा



### दरबार ए शायरी

किल्लेदार तो फितूर तरीही
तोच असे सरदार जिथे !
इमानदार बुरूजांची कोणी
कदर कशी करणार तिथे !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे, ॲडव्होकेट, चिखली.

### चारोळी

अंधाऱ्या झोपडीतही
एक दिवा ज्ञानाचा पेटावा
हात माणूसकीचा करावा पुढे
त्याचाही कोपरा थोडातरी नटावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# मुखेड युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी मुंगनाळे तर सचिवपदी शिवकुमार बिरादार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड | प्रतिनिधी**





मुखेड - युवा ग्रामीण संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या आदेशान्वये मुखेड येथील जिजाऊ ज्ञान मंदिर येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाची नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यात अध्यक्ष म्हणून प्राध्यापक पांडव मुंगनाळे तर सचिव म्हणून शिवकुमार बिरादार यांची निवड करण्यात आली.

नूतन कार्यकारणी अशी की संघटक व ज्येष्ठ मार्गदर्शक ज्ञानोबा जोगदंड, उपाध्यक्ष मनोज बिरादार, कोषाध्यक्ष उत्तम वाडीकर, सहसचिव संग्राम पाटील तांदळीकर, सहसंघटक गणेश अकुलवार,ज्येष्ठ सल्लागार गुरुनाथ पेंढारकर यांची निवड करण्यात आली सदरील संघटना सामाजिक घटकांचा न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असून यामध्ये शेतकरी, शेतमजूर, निराधार, अपंगत्वाच्या समस्या, व ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्न आरोग्य, रस्ते,सामाजिक प्रश्नाबाबत समस्या निवारणासाठी आपल्या बातमीच्या माध्यमातून वाचा फोडणारी आहे या निवडी बद्दल समाज माध्यमातून आनंदाचा वर्षाव होत आहे तसेच संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश जी कचकलवार यांनी या कार्यकारणी निवडीचे स्वागत केले आहे.

# शशिकांत खेडेकर आज हातात बांधणार घड्याळ

### सिंदखेड राजा विधानसभेसाठी महायुतीची उमेदवारी निश्चित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**



सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार डॉ.शशिकांत खेडेकर हे आज शिवसेनेला जय महाराष्ट्र करून राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार)पक्षात प्रवेश करणार आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत आज प्रवेश करणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस कडे एकमेव सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघ आहे. डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून काही दिवसांपूर्वीच शरद पवार गटात प्रवेश केला होता. कालच त्यांनी उमेदवारी अर्ज देखिल दाखल केला आहे. महायुतीमध्ये अनेक इच्छुक होते. परंतु माजी आमदार शशिकांत खेडेकर यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडली आहे. गायत्री शिंगणे यांनी सुध्दा अजित पवारांची भेट घेतली होती. परंतु त्यांना उमेदवारी मिळू शकली नाही. त्यामुळे गायत्री शिंगणे काय भुमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.

### आमदार खेडेकर निश्चित

**सिंदखेड राजा मतदारसंघात संघात मोठ्या प्रमाणात विकास कामे तसेच अनेक मतदारांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत उपलब्ध करून दिली असल्याने डॉ शशिकांत खेडेकर यांना मतदार संघातील मतदार लक्षात घेऊन या विधानसभा निवडणुकीत त्यांचा विजय होऊन आमदारकीचा गुलाल त्यांच्या वर पडणार असल्याची चर्चा मतदारांकडून ऐकायला मिळत आहे.**

# संजय घोगरे पाटील यांचा ८७ - नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातुन अपक्ष अर्ज दाखल




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | भारत वानरे**

नांदेड दक्षिण विधानसभेसाठी अपक्ष अर्ज संजय शिवाजीराव घोगरे यांनी दिनाक २४/१०/२०२४ रोजी भरला असून लाखोच्या संख्येने अनेक समाज बांधव आणि बघिणी सहित शयक्ति प्रदर्शन केले संजय शिवाजीराव घोगरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज हडको येथील पुतळ्या पासुन नांदेड शहरातील चोफळा ते तहसील कार्यालय प्रेन्त भव्य रॅली काढण्यात आली संजय पाटील घोगरे यांनी जनते समोर अनेक विकास कामाचा लेखाजोखा मांडून नांदेड तहसील कार्यालय येथे अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे संजय घोगरे नांदेड दक्षिण विधान सभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

# जरांगे पाटील यांनी घेतल्या एकोणीशे उमेदवारांच्या भारताच्या इतिहासातील अनोख्या मुलाखती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अंतरवाली सराटी । वृत्तसंस्था**

आता कसं ? पाटील म्हणतील तसं. ना झोप... ना आराम...मनोज जरांगे पाटील यांनी तब्बल २५ तास घेतल्या, इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती...भारताच्या इतिहासातील इच्छुक उमेदवारांच्या अनोख्या मुलाखती ! मराठा क्रांती योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी गुरुवारी अंतरवाली सराटी येथे विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. जवळपास १९०० इच्छुक उमेदवारांनी महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी म्हणून अर्ज केले आहेत. गुरुवारी सकाळी ८.३० वाजता छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यापासून मुलाखतींना सुरुवात झाली. शुक्रवारी सकाळी ९.३० वाजता मुलाखतीचा पहिला टप्पा पार पडला. विशेष म्हणजे तब्बल २५ तास मनोजदादा जरांगे पाटील यांनी झोप न घेता, कुठलाच आराम न करता या मुलाखती सलगपणे स्वतः घेतल्या. त्यांना प्रा. चंद्रकांत भराट, प्रदीप सोळुंके, सुरेश वाकडे यांनी सहकार्य केले.

महाराष्ट्रात आणि भारतात अनेक पक्ष आणि संघटना आहेत. निवडणुका आल्या की त्या त्या पक्षाच्या आणि संघटनांच्या उमेदवारांच्या मुलाखती होतात. खरं तर अशा उमेदवारांच्या मुलाखती या एक तर पक्षाचे कार्यालय किंवा पंचतारांकित हॉटेलमध्ये होतात. मेजवानी होतात. पण मनोजदादा जरांगे पाटील यांच्यासारख्या सामान्य माणसाच्या लढ्याने भारतालाच नाही तर जगाला चक्रावून टाकले आहे. उमेदवाराच्या मुलाखतींना सुरू करण्यापूर्वी मला काहीच नको. मला सर्व काही तुम्हालाच द्यायचे आहे. मी तुमच्यासाठीच हे सर्व करत आहे. माझा गरीब मराठा समाज फसला नाही पाहिजे. निवडणुकीत विजय होवो, अथवा पराजय.मला एकट वाऱ्यावर सोडू नका. कुठल्याही हाकेला, कोणत्याही क्षणी तात्काळ हजर राहा.जरांगे पाटलांच्या या वाक्याने उपस्थित इच्छुक उमेदवारांचे मन हेलावून गेले.

भारताच्या इतिहासातील ही खरोखरच एक दुर्मिळ घटना आहे. गाव खेड्यातील एका दुर्गम भागात हजारो चार चाकी वाहने येतात. विस्तीर्ण जागेवरील पार्किंग मध्ये ही वाहने शिस्तीमध्ये



लागतात. उपस्थितांना पिण्यासाठी पाणी, गावरान जेवण आणि चहा पाण्याची व्यवस्था वेळोवेळी होत होती. ही व्यवस्था कोणाकडे होती ? कोण कुठून आणत होते आणि कोण आणून देत होते ? हे कोणासही कळत नव्हते. पण उपस्थित इच्छुक उमेदवारांना मात्र वेळोवेळी सेवा मिळत होती. स्वयंसेवक कुठलाही आळस न करता सेवा देत होते.

एका सामान्य माणसाच्या लढ्याला मिळणारे हे बळ वाखाणण्याजोगे आहे. मुलाखतीच्या ठिकाणाहून एकही माणूस हालत नव्हता. त्याला आळस येत नव्हता. भारतात अनेक पक्ष आहेत.पक्षप्रमुख आपल्या पद्धतीने कसे चालवतात. पण अंतरवाली सराटी इतकी शिस्त कुठेच दिसून येत नाही. गिनीज बुकात नोंद व्हावी, अशी ही घटना. इतिहास याची नोंद घेईलच. त्याच्यापेक्षा दुसरे एक आश्चर्य असे की, प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवार कुठलाच हट्ट न करता दादा, तुम्ही तुमच्या पद्धतीने उमेदवार द्या. आम्ही काहीच बोलणार नाही. तुम्ही दिलेल्या उमेदवाराच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे राहू. त्याला निवडून आणू, अशी साक्ष देत होते. खरोखरच भारताच्या इतिहासातील ही एक अनोखी घटना आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, बीड आणि जालना या आठ जिल्ह्यातील ४७ विधानसभा मतदार संघातील इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. याबरोबरच सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, अहिल्यादेवी होळकर नगर, धुळे, जळगाव, बुलढाणा, यवतमाळ, अमरावती, नागपूर अशा तब्बल २४ जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती झाल्या.

एखाद्या राजकीय पक्षाच्या, संघटनेच्या वतीने निवडणूक लढवितांना जेव्हा इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जातात, तेव्हा अशा मुलाखती दिवसा घेतल्या जातात. पण रात्रभर जागे राहून एकही इच्छुक उमेदवार राहून जाऊ नये, याची काळजी मनोज जरांगे पाटील यांनी घेतली. हा त्यांच्या मनाचा मोठेपणाच म्हणावा लागेल. हल्ली कुठल्याही राजकीय पक्षाकडे उमेदवारी मागताना अनेक प्रकार चालतात. इथे मात्र खुद्द मनोज जरांगे पाटील यांनी इच्छुकांना प्रश्न विचारून इच्छुकांचे समाधान केले. म्हणून इच्छुक उमेदवार म्हणू लागले,आता कसं ? पाटील म्हणतील तसं ! भारताच्या इतिहासात अशा घटना दुर्मिळच म्हणाव्या लागतील.

## लोकनेताच्या टवाळक्या

मित्रहो....

सद्या परिस्थिती अशी झाली आहे. एकाही नेत्याला नाक राहील नाही. आणि आपण याच नेत्यांमध्ये आपला देव पाहतो हे वास्तविक आहे यात झाकून ठेवण्यासारखे काही नाही. नेते पहील्यादिवसा पासून लोकांना मुर्खात कसे काढतात आम्ही जवळून बघितलेल आहे. त्यामुळे केव्हाही नेत्यांमाघे जावं असं मनात आलं नाही. जातिजाती मध्ये भांडण लावून स्वतःची घर भरणे हाच हेतू त्यांचा असतो. परंतु आपण आयुष्याची माती करून घेत त्यांच्या माघे फिरू नका इतकेच. प्यायला शिकलेले आता हे पैसे देत नाहीत म्हणुन दुसऱ्या पक्षात असल्याचे जिवंत उदा. आमच्या कडे आहे आहात आणि निवडून यायचं म्हणून पक्ष बदलणारे नेते तर पावलो पावली आहेत..

ठराव काय ते... नेत्यामाघे हिंडायच की स्वाभीमानी बनायचं ते...

पटलं त द्या नाहीत आम्हाला फेकून हाना... हरकत नाही



ज्ञानेश्वर सुरेश बुधवत
मुख्यसंपादक दैनिक लोकनेता
संस्थापक – विश्व फाउंडेशन म. राज्य
मातृतीर्थ सिंदखेड राजा
मो. न. ९९६०२०९१४९

# लोहा–कंधार विधानसभेवर महायुतीचाच झेंडा फडकवणार–प्रतापराव पाटील चिखलीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

लोहा- कंधार विधानसभा मतदारसंघावर महायुतीचा झेंडा फडकवणार,असा विश्वास माजी खासदार तथा लोहा विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

माजी खासदार तथा लोहा व कंधार विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शनिवारी, दि. २६ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता संपर्क कार्यालय,कंधार येथे पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष माधवराव धर्माधिकारी,भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ.प्रणिता देवरे-चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर,भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष भगवान राठोड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संभाजी मुकनर, भाजपचे तालुकाध्यक्ष किशनराव डफडे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी प्रतापराव पाटील चिखलीकर





म्हणाले,मी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार या तीनही नेत्यांनी मला लोहा-कंधार विधानसभेसाठी सन्मानपूर्वक उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे मी सर्व महायुतीच्या नेत्यांचे जाहीर आभार मानतो. मी सोमवारी,दि २८ऑक्टोबर रोजी लोहा-कंधार विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज भरणार आहे. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, कृषीमंत्री धनंजय मुंडे, खासदार डॉ.अजित गोपछडे आदी नेते उपस्थित राहणार आहेत. यंदा लोहा विधानसभेवर महायुतीचा झेंडा फडकवणार आहे. मी व माझे कुटुंब नेहमी सर्वांच्या सुख, दुःखामध्ये सहभागी झाले आहे. माझ्या सर्व निवडणुकीमध्ये दलित व मुस्लिम समाज बांधवांनी आशीर्वाद दिला आहे. प्रत्येक समाज घटकांनी मला मोलाची साथ दिली आहे. अशीच साथ पुन्हा एकदा द्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

> **❝ खासदार तथा लोहा विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या रूपाने एक रोपट कंधार–लोहा तालुक्यांतील जनतेने लावले ते वाढवले त्याचे रूपांतर वटवृक्षात झाले.त्याला जोपासण्याचे काम कंधार आणि लोह्याच्या जनतेने केले असे विनम्र आवाहन मा.खा चिखलीकर यांनी केले,**

यावेळी ड.मारोती पंढरे, ड.बाळासाहेब सोनकांबळे, मधुकर डांगे, ज्ञानोबा मुंडे, निलेश गौर,शेख आसेफ,शिवाजी लुंगारे, चेतन केंद्रे, व्यंकट नागलवाड, सौ.वंदना डुमणे,उत्तम लुंगारे, व्यंकट मामडे, गणेश ठवरे, रामकिशन पंदनवड,घोरबाड सर, मारोती गायकवाड, रजत शहापुरे, शंतणू कैलासे, हणमंत डुमणे आदी उपस्थित होते.

# मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे सहकार विद्या मंदिर येथे प्रशिक्षण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

२४ सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात निवडणुक विभाग जोमाने काम करताना दिसत आहे. दि.२६ रोजी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे सहकार विद्या मंदिर येथे प्रशिक्षण घेण्यात आले.

प्रशिक्षण दरम्यान भारत निवडणूक आयोग यांची कायदे,तरतुदी आणि अद्ययावत सूचना यांची माहिती सांगण्यात आली. ईव्हीएम, व्हीव्हीपॅट कार्यप्रणाली यांच्या बद्दल सविस्तर माहिती सांगण्यात आली, टपाली मतपत्रिका व निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र अर्ज व नमुने यांचा अहवाल भरणे बाबत माहिती सांगण्यात आली.

मतदान संकलन केंद्रावर ईव्हीएम तसेच मतदान साहित्य ताब्यात घेणे,सूचीनुसार साहित्य तपासणी करणे, ईव्हीएम तपासणी करणे, टपाली मतपत्रिका घेतली असेल तर स्वतःचे मतदान करून घेणे याबद्दलची सविस्तर माहिती देण्यात आली.

मतदानापूर्वी कोणकोणत्या गोष्टीची काळजी घेतली पाहिजे याबद्दल प्रा.खडसे यांनी सांगितले कि, मतदान केंद्र उभारणी करणे,अभीरूप (मॉकपोल) मतदान घेणे, कंट्रोल युनिट मधून अभिरुप मतदान नष्ट करणे, VVPAT मधील अभिरूप मतदान चिठ्ठया करणे सील करणे याबद्दलची दक्षता घेतली पाहिजे यावर खडसे यांनी भर दिला.

EVM मशीनच्या वापराबद्दल आणि त्याच्या हाताळणी बद्दल ईव्हीएम प्रशिक्षण कक्षाचे नोडल अधिकारी उद्धव मांटे आणि सहाय्यक नोडल अधिकारी शिवानंद वाकदकर यांनी सर्व मतदान अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले.

मतदानादरम्यान मतांच्या गोपनियते बाबत माहिती देणे,मतदान सुरू केल्याची घोषणा करणे, मतदान केंद्राध्यक्ष यांनी दैनंदिनी मध्ये घटनांची नोंद घेणे, निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतदान स्थिती आकडेवारी कळविणे इत्यादी गोष्टी मतदानादरम्यान करायला पाहिजे याबद्दल सरांनी मुद्देसूद माहिती दिली.

या दोन दिवसाच्या प्रशिक्षणा दरम्यान आज पहिल्या दिवशी मतदान अधिकारी, झोनल अधिकारी,मास्टर ट्रेनर यांना प्रशिक्षण देण्यात आले, सोबत निवडणूक साहित्य स्वीकृती व तपासणी बाबत मार्गदर्शन सूचना करण्यात आले, मतदानाच्या एक दिवस अगोदरची मतदान केंद्रावरील पूर्वतयारी कशाप्रकारे असायला हवी याबद्दल काही सूचना प्रा. खडसे यांनी दिल्या आहेत.

प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वीची कामे कशाप्रकारे पार पडली पाहिजे आणि त्याची दक्षता कशी घेतली पाहिजे याबद्दल प्रा. खडसे यांनी काही महत्त्वाच्या गोष्टीं सांगितल्या, प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात करताना मतदान अधिकारी यांनी त्यांची कामे कशाप्रकारे पार पडली पाहिजेत तसेच मतदान केंद्राध्यक्ष यांनी महत्त्वाच्या प्रसंगी करावयाचे कार्यवाही याबद्दल त्यांना माहिती सांगण्यात आली.

या दोन दिवसाच्या प्रशिक्षणासाठी आज मा. तहसीलदार सिंदखेड राजा अजित दिवटे, मा. तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, मा. गट विकास अधिकारी सिंदखेड राजा मुकेश माहोर, मा.निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेड राजा मनोज सातव, मा. निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रवीण घोटकर, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा अस्मा मुजावर, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा डॉ. प्रवीणकुमार वराडे, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा प्रांजल पवार, मा. प्रभारी नायब तहसीलदार नितीन बढे, मा. प्रसार व प्रचार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

### अखेर रविकांत तुपकरांची भूमिका ठरली

# महाविकास आघाडीसोबत जाणार नाही;काही मतदार संघात कार्यकर्त्यांना अर्ज दाखल करण्याच्या सूचना

## बुलडाण्यात काय करायचं..?२९ ऑक्टोबरपर्यंत ठरणार...



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सोबत चर्चा फिस्कटल्यानंतर रविकांत तुपकर यांची भूमिका काय राहणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागून होते. अखेर आता तुपकर यांनी त्यांची भूमिका जाहीर केली असून, महाविकास आघाडीने सन्मानाने सोबत घेतले नाही, मग त्यांच्यासोबत फरपटत कशाला जायचे...? अशी पदाधिकारी-कार्यकर्त्यांची भूमिका असल्याने महाविकास आघाडी सोबत जाणार नाही, अशी भूमिका रविकांत तुपकर यांनी जाहीर केली आहे. शिवाय राज्यातील काही मतदारसंघात अर्ज दाखल करण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. बुलडाणा विधानसभा मतदारसंघात काय करायचे याबाबतचा निर्णय २९ ऑक्टोबरला घेणार असल्याचे रविकांत तुपकरांनी सांगितले. आज बुलडाणा येथे रविकांत तुपकर यांनी आज प्रमुख पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलवली होती. या बैठकीत अनेक विषयांवर निर्णय घेण्यात आले. या बैठकीनंतर रविकांत तुपकर यांनी माध्यमांशी बोलतांना आपली भूमिका जाहीर केली.

> **क्रांतिकारी शेतकरी संघटना अपक्ष व चळवळीची पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना देणार पाठिंबा...**
>
> **क्रांतिकारी शेतकरी संघटना ही सामाजिक संघटना आहे. आमच्याकडे पक्ष नाही, त्यामुळे काही मतदारसंघात आमचे कार्यकर्ते अपक्ष अर्ज दाखल करतील व त्यांना क्रांतिकारी शेतकरी संघटना पाठिंबा देईल, त्यांच्याबरोबर राज्यातील अनेक मतदारसंघात स्वच्छ चारित्र्याच्या, शेतकरी चळवळीशी पार्श्वभूमी असलेल्या चांगल्या विचाराच्या अपक्ष उमेदवारांना क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने पाठिंबा देणार असल्याची भूमिका रविकांत तुपकरांनी यावेळी स्पष्ट केली.**

महाविकास आघाडीसोबत जावे अशी आमच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांची इच्छा होती, त्यासंदर्भात महाविकास आघाडीच्या वरीष्ठ नेत्यांशी चर्चा देखील झाली होती. या चर्चेत बुलढाण्याच्या जागेसंदर्भात सकारात्मक निर्णय देखील झाला होता. परंतु वेळेवर हा निर्णय बदलला गेला. त्यांना जर आपली गरज नसेल, सन्मानाने सोबत घेत नसतील तर आपण फरफटत त्यांच्यासोबत जायचे नाही, अशी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भूमिका असल्याने आम्ही महाविकास आघाडीसोबत जाणार नाही, अशी भूमिका रविकांत तुपकरांनी बुलढाणा येथे झालेल्या बैठकीनंतर जाहीर केली. यावेळी बोलतांना रविकांत तुपकर म्हणाले की याबैठकीत विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अनेक निर्णय झाले. त्यानुसार काही मतदारसंघात कार्यकर्त्यांनाअर्ज दाखल करण्याच्या सूचना आम्ही दिल्या आहे. त्यानुसार २९ ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करतील, तसेच राज्यातील अनेक मतदारसंघात स्वच्छ चारित्र्याच्या, शेतकरी चळवळीशी पार्श्वभूमी असलेल्या चांगल्या विचाराच्या अपक्ष उमेदवारांना क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने पाठिंबा देणार असल्याची भूमिका रविकांत तुपकरांनी स्पष्ट केली. बुलडाणा विधानसभा मतदारसंघाबाबत काय निर्णय घ्यायचा याबाबत आम्ही २९ ऑक्टोबर पर्यंत ठरवू असेही तुपकर यांनी जाहीर केले..

# संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटलांनी सरपंच अशोक पोकळे यांना उमेदवारी द्यावी

## आष्टी/पाटोदा/शिरूर विधानसभा मतदारसंघातील जनतेची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विधानसभेच्या निवडणुकीत चांगलीच रंगत आलेली पाहायला मिळत आहे. बीड जिल्ह्यातील अनेक मतदारसंघातील वेगवेगळ्या पक्षाचे उमेदवार जाहीर झाले आहेत. तरी देखील संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात या कडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. खास करून आष्टी/पाटोदा/ शिरूर विधानसभेसाठी उमेदवार कोण या वर अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. परंतु सर्वसामान्य जनतेच्या तोंडी अशोक पोकळे यांचेच नाव समोर येत आहे. त्यांनाच उमेदवारी जाहीर करावी अशी मराठा समाज बांधवांची व येथील जनतेची मागणी आहे.

संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून आज तागायत अशोक पोकळे सावली प्रमाणे त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांनाच उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी होत आहे.मराठा सेवक अशोक पोकळे यांनी युवकांना एकत्रित करून आणि अडचणीत धावून जाणं आणि मदत करणं ही त्यांची पहिल्यापासूनच असलेली ओळख आजतगायत मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून खंबीरपणे सावली सारखं उभ असलेलं अख्ख्या महाराष्ट्राने पाहिलं आहे. आष्टी/पाटोदा/ शिरूर मराठा मुस्लिम दलित समाजामध्ये त्यांची चांगलीच ओळख असून त्यांना उमेदवारी मिळाली तर मोठ्या मताने निवडून येतील असा जनतेचा विश्वास आहे. मराठा, मुस्लिम, दलित समाजामधून देखील त्यांच्या नावाला पसंती मिळत असून उमेदवारी जाहीर करून आष्टी/ पाटोदा/ शिरूर विधानसभेला हक्काचा स्वाभिमानी, संघर्षशील उमेदवार द्यावा अशी मागणी सुद्धा होत आहे. पाटलांचा आदेश आल्यावर मी निवडणूक लढणार अन् जिंकणार असे अशोक पोकळे यांनी सांगितले आहे. गरजवंत मराठ्यांच्या लेकरांसाठी आपला जीव पणाला लावून लढणारा आमचा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील त्यांचे खांदे समर्थक अशोक राजेंद्र पोकळे चिंचाळा, तालुका आष्टी, जिल्हा बीड, येथील असून त्यांनी कोविड-१९ हे जगावर महाभयंकर संकट आले होते. या काळात २०२०-२१ मध्ये हजारो रुग्णांना मदत केली, धीर दिला व जीवदान मिळवून दिले. वाढदिवसा निमित्त २०२१ या वर्षी ५०% अनुदानावर १२४० घरगुती पिठाच्या गिरण्या गोरगरिबांना वाटप केल्या. वाढदिवसा निमित्त २०२२ या वर्षी ३४ गावांमधील ३२०० महिलांना मोहटा देवीचे मोफत देवदर्शन घडवले. परिसरातील पितृछत्र हरवलेल्या दहा मुलांना दत्तक घेतले. व त्या पैकी दोन मुलींचे कन्यादान ही केले. तसेच परिसरातील ब्रह्मगाव, आंबेवाडी, मंगरूळ, देसूर, बीड सांगवी, गणगेवाडी, बेलगाव, शेकापूर, चिंचाळा व राघापूर अशा अनेक गावांमध्ये २५ किलो मीटर रस्त्याचे काम अडचण पाहून स्वखर्चाने करून दिले. जनावरांमधील लंपी आजाराने २०२३ या वर्षी थैमान घातले होते. त्या काळामध्ये १७००० जनावरांना मोफत लसीकरण करून दिले. मराठा आरक्षणासाठी आपल्या गावामध्ये सात दिवस पाणी व अन्नत्याग आंदोलन केले. गावा मध्ये सरकारची अंत्ययात्रा काढली. आष्टी शहरातील जरांगे पाटील यांच्या सभेपूर्वी ४२ गावांमध्ये सायकलवर प्रवास करून सभेचे निमंत्रण पोहोच केले. ज्या गावात रात्र होईल तेथेच मुक्काम ही केला आहे. आंतरवली सराटी येथील आपल्या सभेसाठी आष्टी ते आंतरवाली असा १८० किलो मीटरचा चार दिवस प्रवास करून वाटेवरील गावांमध्ये जनजागृती केली. तसेच बीड येथील शांतता रॅलीमध्ये लोकांनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे म्हणून आष्टी/ पाटोदा/शिरूर या तीन तालुक्यातील गावांमध्ये आरक्षण वादी कार्यकर्त्यांबरोबर निमंत्रण देण्याचे काम केले. कुस्तीच्या तालमीमध्ये सराव करणाऱ्या कुस्तीगीरांना व गोरगरीब रुग्णांना वेळोवेळी यथाशक्ती आर्थिक सहकार्य केले होते.मराठा आरक्षण आंदोलनाच्या वेळी आंतरवली सराटी मध्ये माता माऊली यांच्या वरती जेव्हा लाठी चार्ज झाला तेव्हापासून राजकीय पक्षाशी फारकत घेतली. आज पर्यंत जरांगे पाटील यांच्या सर्वच भूमिकाशी एकनिष्ठ आहे.



प्रत्येक व्यक्तीच्या सुखा दुःखामध्ये सामील हो ना आधार देण्याचे काम नेहमीच करतात आष्टी/पाटोदा/शिरूर तालुक्याची पिंपळवंडी येथील घोंगडी बैठकी वेळी तालुक्यातील ६९ गावांमध्ये सायकल वरती जाऊन निमंत्रण दिले. व जनजागृती करत घोंगडी बैठकीला हजर राहिलो. २२/०९/२०२४ धामणगाव ता,आष्टी येथील मारूती मंदिरामध्ये चार दिवस जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून अन्न व पाणी त्याग अशोक पोकळे व साई पोकळे यांनी उपोषण केले. श्री क्षेत्र नारायण गड येथीली दसरा मेळाव्या संदर्भात १८ पगड जातींना, आष्टी/ पाटोदा/शिरूर तालुक्यातील ७७ गावांमध्ये जाऊन सायकल वरती जाऊन जनजागृती व निमंत्रण दिले. तसेच ज्या गावी अंधार पडेल त्याच गावी मुक्काम असे निमंत्रण दिले व नारायणगड ते अंतरवली सराटी मराठ्यांचे दैवत संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या दर्शनासाठी १३ तारखेला पोहोचले. पाटलांच्या सर्व आंदोलनात मराठा सेवक अशोक पोकळे कायम दिसायचे, मराठा आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून मराठा सेवक अशोक पोकळे हे अख्ख्या महाराष्ट्राने पाहिलं आहे. म्हणूनच आपल्या हक्काचा, स्वाभिमानी, विश्वासाचा, आपला उमेदवार म्हणून अशोक पोकळे यांच्या कडे आष्टी/पाटोदा/शिरूर विधानसभेतील जनता पहात आहे त्या मुळे पाटलांनी जनतेचा विचार करून अशोक पोकळे यांना उमेदवारी जाहीर करावी अशी मागणी आष्टी/ पाटोदा/शिरूर मतदार संघातील १८ बागड जातीच्या जनतेकडून मागणी होत आहे.आदरणीय जरांगे पाटील यांनी घेतलेला निर्णय सर्वांनाच मान्य आहे. आष्टी/पाटोदा/ शिरूर विधानसभेची निवडणूक अशोक पोकळे यांनी लढवावी अशी मराठा, मुस्लिम, दलित, ओबीसी व अठरापगड जातींच्या जनतेची मागणी होत आहे.


### मा.आ.भीमराव धोंडे यांनी केलेल्या

# शैक्षणिक विकासामुळे गोरगरिबांची मुले उच्चशिक्षित-नानाभाऊ वाडेकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांच्यामुळे मतदारसंघाच्या विकासाबरोबर शैक्षणिक विकासही मोठ्या प्रमाणात झाला आहे, त्यांच्यामुळे ग्रामीण भागातील वाड्या-वस्तीवरील गोरगरिबांचे मुले मुली उच्चशिक्षित बनली आहेत मतदारसंघाचा यापेक्षाही जास्त शैक्षणिक विकास करण्यासाठी विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यांना सहकार्य करावे असे आवाहन पुंडी येथील जेष्ठ कार्यकर्ते नानाभाऊ वाडेकर व्यक्त केले.



याबाबत अधिक माहिती देताना नानाभाऊ वाडेकर यांनी सांगितले की,

आष्टी पाटोदा शिरूर हा कायमस्वरूपी दुष्काळी भाग आहे. पुर्वी आष्टी तालुक्यात एक - दोन माध्यमिक शाळा व एकमेव वरिष्ठ महाविद्यालय होते. सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात वाढलेले भीमराव धोंडे हे १९८० साली विधानसभेवर निवडून गेल्यानंतर ते सलग पंधरा वर्षे विधानसभा सदस्य राहिले, त्यांनी शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आज गावागावात, ग्रामीण भागात, डोंगरी भागात त्यांनी सुरू केलेल्या शाळामधून हजारो विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत.तसेच हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन पुढे उच्चशिक्षित होऊन शहरात नोकरी आणि व्यवसाय करीत आहेत. माजी आ.भीमराव धोंडे यांनी सुरू केलेल्या शाळामुळे खेड्यापाड्याचे मुले शिकले आहेत.त्यापूर्वी ग्रामीण भागातील पालक आपल्या मुला मुलींना विशेष करून मुलींना नगर,पुणे,संभाजीनगर या ठिकाणी शिक्षणासाठी पाठवत नव्हते.ठराविक पालकच आपल्या पाल्यांना बाहेर शिक्षणासाठी पाठवत होते,परंतु माजी आ.भीमराव धोंडे यांनी गावागावात शाळा सुरू केल्या. कडा,आष्टी,धानोरा, तिंतरवणी,अंमळनेर येथे वरिष्ठ महाविद्यालय सुरू केले तसेच आष्टीत कृषी,वैद्यकीय इंजीनियरिंग,फार्मसी असे सर्व प्रकारचे महाविद्यालये आष्टी येथे सुरू केल्याने तालुक्यातील खेड्यापाड्यातील मुले मुली उच्चशिक्षित बनले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी शैक्षणिक विकासाबरोबर वीस वर्षे विधानसभा सदस्य असताना मतदारसंघाचा चांगला विकास केला आहे गावागावात पाझर तलाव केले. गांव, वाड्या, वस्त्या चांगल्या रस्त्याने जोडले आहेत असा सार्वजनिक विकास मोठ्या प्रमाणात केला आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना मतदानाच्या रुपाने सहकार्य करण्याचे आवाहन वाडेकर यांनी केले आहे.

# लोणी व्यंकनाथ येथे बिबट्याचा मोठ्या प्रमाणावर धुमाकूळ एका शेळीचा बळी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे गेल्या आठ दिवसापासून बिबट्याने मोठा धुमाकूळ घातला असून; अल्पभूधारक शेतकरी बाळासाहेब श्रावण नेटवटे यांच्या एका शेळीचा सदर बिबट्याने बळी घेतला आहे. या बिबट्याच्या दहशतीमुळे वाड्या वस्त्यांवर ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये मोठे भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार दोन-चार दिवसापूर्वी लोणी व्यंकनाथ येथील शेतकरी नेटवटे यांच्या वस्तीवरील शेळ्यांच्या गोठ्यात बिबट्याने हल्ला करून सदर शेळीचा बळी घेतला आहे. गेल्यावर्षी याच वस्तीवर बिबट्याने हल्ला करून दोन शेळ्यांचा बळी घेतला होता आता पुन्हा याच शेतकऱ्याच्या शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार लोणी व्यंकनाथ शिवारात अनेक बिबट्यांचा वावर सुरू असून; रात्री अपरात्री वस्त्यांवरील जनावरांवर सदर बिबटे हल्ला करून बळी घेत आहेत. विशेष म्हणजे सध्या शेतकरी मजुरांसमवेत कापूस वेचणीला सुरुवात करत आहेत. अशा परिस्थितीत बिबट्याने या लोणी व्यंकनाच्या शिवारात धुमाकूळ घातल्याने शेतमजूर देखील शेती कामाचे धाडस करत नाहीत. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार बिबट्याचा लोणी व्यंकनाथ शिवारात अनेक वर्षापासून वावर आहे. त्याचे ठसे देखील वारंवार शेतकऱ्यांना दिसतात. रात्री अपरात्री शेतकरी भरणे करीत असताना अचानक सदर शेतकऱ्यावर बिबट्याचा हल्ला होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार लोणी व्यंकनाथ शिवारात वन कर्मचाऱ्यांकडून पिंजरा लावण्याची मागणी होत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासन नियमानुसार वनविभागाकडून नुकसान भरपाई मिळण्याची मागणी होत आहे.

दरम्यान संबंधित लोणी व्यंकनाथचे नुकसानग्रस्त शेतकरी बाळासाहेब नेटवटे यांनी पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांना बिबट्याच्या घटनेची बातमी देताच पत्रकार कुरुमकर यांनी संबंधित वन विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी बिबट्याची माहिती घेऊन तात्काळ पिंजरा लावण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर वनविभागाचे कर्मचारी श्री शिंदे यांनी नेटवटे यांच्या वस्तीवर जाऊन ज्या ठिकाणी बिबट्याने शेळीवर हल्ला केला तेथील जागेचा पंचनामा केला आहे. यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी बाळासाहेब नेटवटे व त्यांचे कुटुंब यावेळी उपस्थित होते. काही शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार उसाच्या शेतामध्ये बिबट्या वास्तव्य करत असून; मध्यरात्री बिबटे भक्षणासाठी शेतकऱ्यांच्या शेळी व गायींच्या गोठ्यांमध्ये जाऊन त्यांचा बळी घेत आहेत. परंतु अशा परिस्थितीत जर शेतकरी त्या बिबट्यावर प्रतिकार करण्यासाठी गेला तर त्या शेतकऱ्यांवर देखील बिबट्याचा हल्ला होण्याची शक्यता असल्याने संबंधित वन विभागाचे अधिकाऱ्यांनी तात्काळ पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# रस्त्यावर गिट्टी अंथरूण ठेवल्याने होत आहेत अपघात गिट्टी अंथरूण वाहनाला अडथळा निर्माण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । प्रतिनिधी**

वाघलवाडा पाटीपासून ते कुसुमनगर वाघलवाडा कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर गुत्तेदाराने चार महिन्यांपासून गिट्टी अंथरूण ठेवली आहे. रस्त्याचे काम संथगतीने सुरू असल्यामुळे पादचारी व वाहनचालक त्रस्त झाले आहेत. गिट्टीवरून वाहने चालविताना अपघात घडत आहेत. कुसुमनगर वाघलवाडा साखर कारखान्याकडे जाणारा रस्ता रहदारीचा असल्याने वाहनांची संख्या जास्त आहे. अनेक जड वाहने घसरून रस्त्याखाली जात आहेत. दुचाकीचालक गिट्टीवरून जाताना घसरून पडतात.



येत्या काही दिवसात कुसुमनगर वाघलवाडा साखर कारखान्याच्या गाळपाला सुरवात होणार आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित गुत्तेदाराकडून रस्त्याचे काम करून घ्यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कडे शिक्षकांच्या समस्या सोडविण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती जिल्हा शाखा-नांदेड यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी (जिल्हाधिकारी) यांना शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी निवेदन देऊन मागणी केली आहे.निवडणूक कार्याबाबत शिक्षकांच्या खालील मागण्या आहेत.(१) दिव्यांग असून खुप आजारी असल्याची सत्यता पडताळून निवडणूक कार्यातून त्यांना सूट दयावे.(२) महिला शिक्षिकांना सोयीच्या ठिकाणी निवडणूक कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दयावे.(३) बी.एल.ओ. मानधनाची नियमीत तरतूद करावी. (४) मागील ग्रामपंचायत निवडणूक कार्याचे मानधन देण्यात यावे. वरिल मागण्यांचा सविनय विचार करून न्याय द्यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती जिल्हा शाखा नांदेड च्या वतीने जिल्हा निवडणूक अधिकारी नांदेड यांच्या कडे केली आहे.

# वाघोलीत वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

वाघोलीत वाहतूकोंडीमुळे जनसामान्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत घेऊन ओलांडावा लागत आहे. ईतर वेळी सुध्दा वाहतूक कोंडी मुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा प्रश्न सातत्याने भेडसावत आहे.



ऐन दिवाळीच्या तोंडावर गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढल्या कारणाने अजुनच वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसत आहे. चालक मंडळी सुध्दा भरधाव वेगाने सिग्नल तोडून वाहने चालवत आहेत त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही वाहतूक यंत्रणेने करणे गरजेचे आहे. शाळकरी मुलांना व जेष्ठ किंवा ईतर नागरिकांना रस्ता ओलांडताना जीव धोक्यात घालावा लागत आहे. केसनंद फाट्यावर नगरकडे जाणारा रस्ता प्रवाशांनी भरलेला आहे. महामंडळाच्या बसेस ना स्वतंत्र बस स्थानक नसल्या कारणाने त्या बस रस्त्याच्या कडेला थांबुन प्रवाशी घेत असतात म्हणूण त्याचा परीणाम मात्र वाहतूक ठप्प होण्यावर होत आहे. खाजगी वाहने, ट्रॅव्हल्स सुध्दा तोच पाढा गिरवताना दिसत आहेत. वाहतूक यंत्रणेने यात अजुन लक्ष घालने गरजेचे आहे.अपघाताचे प्रमाण वाढण्यामागचं कारण वाहतूक कोंडी व भरधाव वेगाने सिग्नल तोडून जाणारी चालक मंडळी

# सम्राट शाळेत विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप मुख्याध्यापक राहुल सोनसळे यांचा उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

येथील सिध्दार्थ एज्युकेशन सोसायटी संचलित सम्राट अशोक प्राथमिक शाळेत दिवाळीच्या सुट्ट्या लागणार असल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्याध्यापक राहुल सोनसळे व सहशिक्षक सहशिक्षिका यांच्या संकल्पनेतून शाळेतील विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेतला.

सम्राट अशोक प्राथमिक शाळेतील पहीली ते सातवी पर्येत प्रथम सत्र परिक्षा संपल्यावर शिक्षण विभागाने दिवाळीच्या वीस दिवसांच्या सुट्ट्या जाहीर केल्या. सम्राट शाळेत विद्यार्थ्यी अध्यापन सोबतच विविध कलागुणांना प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थी प्रथम सत्रातील परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थी दिवाळीच्या सुट्ट्या मध्ये मामाच्या गावाला जातात. त्यांची भेट होत नसल्याने प्रथम सत्रातील शेवटच्या दिवशी म्हणजे दि २६ ऑक्टोबर शनिवारी दुपारी शाळेतील सहशिक्षक सहशिक्षिका यांच्या संकल्पनेतून मुख्याध्यापक राहुल सोनसळे यांनी खिचडी , ,जिलेबी , समोसा , खिर , वटाणा , मिठाई या पदार्थांचा विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेतला. यावेळी शाळेतील शिक्षक , सहशिक्षिका,यांची उपस्थिती होती. या संकल्पनेचा पालकवर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.



## जागेवरून तोडगा निघत नसेल तर सुट्ट खेळू

# स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या कोण किती पाण्यात आहे हे होऊन जाऊद्या-सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी विधानसभेच्या जागेवरून सुरू असलेला वाटाघाटीचा तिढा सुटत नसेल तर माझी महायुतीच्या नेत्यांनी विनंती आहे घड्याळ नको कमळ नको आम्ही तिघे म्हणजे मी सुरेश धस,भीमराव धोंडे,बाळासाहेब आजबे यांना स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या,कुणाची किती ताकद आहे आणि कुणाची किती पत आहे हे निकालाच्या कळेल तसेच कोण किती पाण्यात आहे हे ही दिसेल त्यामुळे एकदा होऊन जाऊद्या सूट्टा खेळ म्हणत धस यांनी गर्जना केली.

आष्टी येथील निवासस्थानी धस समर्थकांनी शुक्रवारी सकाळपासून मोठी गर्दी केली होती.गुरुवारी काही बालिश लोकांनी सोशल मीडियावर मी निवडणुकीतून माघार घेणार असल्याच्या पोस्ट व्हायरल केल्या होत्या.त्या पार्श्वभूमीवर धस समर्थकांनी आज आष्टी येथील त्यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर गर्दी करत घोषणाबाजी केली.या उपस्थित कार्यकर्त्यांशी बोलताना धस पुढे म्हणाले की,पहिल्या यादीत नाव यावं ही अपेक्षा होती.पक्षाच काम आत्तापर्यंत प्रामाणिक केले आहे.ज्या ठिकाणी भाजप निवडून येणार नाही अशा स्थानिक स्वराज्य संस्थेवर मी उभा राहिलो निवडून आलो माजी मुख्यमंत्री,ग्रामविकास मंत्री यांनी सहकार्य केले.लोकसभेला देखील प्रामाणिक काम केले.२०१९ लोकसभा आणि आत्ताची लोकसभा कुणी प्रामाणिक काम केलं हे पक्षाने तपासाव.वाडी वस्ती तांड्यावर गेलो लोकांना मतदान करा म्हणून आवाहन केलं.बाकीच्यांनी कुठे सभा घेतल्या काय काम केलं याचा लेखाजोखा पक्षाला द्यावा.माझं काम लोकांना दिसतंय कुणाला सांगायची मला गरज वाटली नाही.संकटात लोकांना गरज असताना हे घरात गोधड्या घेऊन झोपले होते.कोरोणा काळात माझ्या दारात लोक मला भेटायला येत होते तेव्हा माझं दार २४ तास उघड होत.त्यावेळी आजी माजी कुठ होते.आता निवडणूक आली म्हणून जाती पातीच विष पेरायच काम सध्या इच्छुक उमेदवारांकडून केले जात आहे.माझ्या राजकीय जीवनात मी कधी कुणाची जात



विचारली नाही.पण त्यात काम करणाऱ्या माझ्या सारख्या माणसाला गोवल जातंय ही फार मोठी शोकांतिका आहे..माझ्यावर तुतारीला भेटायला गेलो असा आरोप केला जातोय.एक जण तुतरीकडे जाण्यासाठी १ महिन्यांपासून उठ बशा काढत होते.आता म्हणतेत मी भेटलोच नाही आणि यात तथ्य नाही.तर दुसरीकडे एक जण मी सकाळी एकाला दुपारी एकला संध्याकाळी एकाला भेटलो असा डांगोरा पिटत आहेत.त्यामुळे अशा लोकांना बालिश बहु बायकात बडबडला...असेच म्हणावे लागेल.लाडकी बहिण कार्यक्रमाला ४०० रुपये रोज देऊन महिला आनाव्या लागल्या.सगळं बोलणार आहे सगळं काढणार आहे ४ तारखे नंतर बोलायला सुरुवात करेन. २०१९ ला स्वतःच्या चुकांनी पडले आणि आमच्यावर खापर फोडून कटप्पा बाहुबलीच्या जाहिराती कोणी दिल्या.मग त्या बाहुबलीला सांगू इच्छितो निवडणुकीच्या काही दिवसात लागलेल्या नगरपंचायत निवडणुकीत आष्टी पाटोदा शिरूर कासार या तिन्ही नगरपंचायत कशाकाय माझ्या ताब्यात लोकांनी दिल्या.याच एकच कारण २४ तास तेवढं लोकांसाठी झिजाव लागतं.सुखात दुःखात जाव यावं लागतं.आता विधानसभेच्या निवडणुका लागल्यात आष्टी विधानसभेच्या जागेवरून सुरू असलेला तिढा अजूनही सुटला नाही.आणि तो जर सुटत नसेल तर माझी महायुतीच्या प्रमुख नेत्यांना विनंती आहे,तोडगा निघत नाही ना तर मग या मतदार संघात घड्याळ देऊ नका,कमळ देऊ नका आम्हाला तिघांना स्वतंत्र लढण्याची परवानगी द्या म्हणजे सुट्टा खेळ होईल.जो निवडून येईल त्याला त्याचा पक्ष स्वतंत्र वाहनाने मुंबईला घेऊन जाईल.अशी गर्जना करत सुरेश धस यांनी निवडणुकीत रंग भरला आहे.यावेळी हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते निवासस्थानी आले होते.

## आष्टी वकील संघाचे अध्यक्षपदी अजय जेवे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी वकील संघाच्या अध्यक्षपदासाठी चुरशीने झालेल्या निवडणुकीत अजय नाना जेवे हे ७५ मते घेऊन विजयी झाले,तर उपाध्यक्षपदी किशोर कल्याण निकाजे,सचिवपदी यासीर ताहेर सय्यद,कोषाध्यक्षपदी संदीप रावसाहेब जगताप व महिला प्रतिनिधीपदी अर्चना चंद्रशेखर पाटील बिनविरोध निवड झाली आहे.आष्टी वकील संघाची जाहिर झाल्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या मुदतीपर्यंत वरिष्ठ मंडळीच्या मार्गदर्शनाखाली सचिव, सचिव,कोषाध्यक्ष महिला यांची बिनविरोध दि.१७ ऑक्टोबर २०२४ रोजी निवड करण्यात आली होती.अध्यक्षपदासाठी अजय नाना जेवे,बाळासाहेब महादेव झांबरे व संभाजी मोहन



दहातोंडे हे तीन उमेदवार रिंगणात होते.दि.२२ ऑक्टोबर २०२४ रोजी मतदान पार होऊन एकूण १४७ पैकी एकूण १४४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.मतदारानंतर सायंकाळी पाच वाजता मतमोजणी झाली.त्यात अजय जेवे यांना ७५ मते मिळून ते विजयी झाले.बाळासाहेब झांबरे यांना ४५,तर संभाजी दहातोंडे यांना २४ मते मिळाली.यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ड.एम.एस.झांजे व ड.बापूराव गर्जे यांनी काम पाहिले.

## भगवानराव कोकाटे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार कृषीउत्पन्न बाजार समितीचे संचालन बिरसा क्रांती संघटनाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव कोकाटे यांचा अभिष्टचिंतन सोहळा टिटवी येथे शिवछत्र मित्र मंडळाचे सस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी,शिवसेना तालूकाप्रमुख भगवान सुलताने पाटील,कृषीउत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती संतोष मापारी ,डॉक्टर नामदेव डाखोरे, अड तनपूरे,भू बा धाडे माजी उपायुक्त मस्तविकास अधिकारी बुलढाणा,गजानन टेकले जिल्हा पुरवठाअधिकारी वी बुलढाना, पवन शर्मा,माजी जिल्हा परिषद सदस्य सौ.गोदावरी कोकाटे,सुवर्णमाला डाखोरे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.डॉक्टर नामदेव डाखोरे यांनी ८५ हजार रुपयाची अंगठी भगवानराव यांना भेट दिली. यावेळी





संतोष मापारी यांनी भगवानराव यांनी ग्राम पंचायत अंतर्गत केलेल्या विकास काम जिल्हा परिषद सर्कल मधील केलेल्या काम वेळोवेळी सामाजिक कार्य व राजकारणात वेळोवेळी खासदार प्रतापराव जाधव यांच्या पाठीमागे उभी केलेली त्याची ताकदीचे कौतुक केले तालूकाप्रमुख भगवान सुलताने पाटील यांनी आपल्या भाषणात भगवानराव यांनी एक छोट्याश्या गावातून आपली राजकिय क्षेत्रात सुरुवात करून तालूका पुरते मर्यादित न राहता बुलडाणा जिल्हाभर सामाजिक राजकीय कार्यातून आपला ठसा उमटवला आपली वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे ते म्हणाले व ईश्वरचरणी भगवानराव यांना दिर्घआयुष्य लाभो अशी प्रार्थना केली.यावेळी ग्रामपंचायतं सदस्य पंढरी कोकाटे,परसराम कोकाटे, देवानंद नरवाडे,मुरलीधर कूटे ,मारुति गिरे,भगवान दांडेकर,शांताराम जटाले,उद्धव कोकाटे,दिलीप राठोड़, भगवान जाधव, शेख चांद शागिर शेख, भगवान कोकाटे गणेश कोकाटे, संतोष तनपूरे,,श्याम तनपूरे,संतोष राऊत, सोबत राशन दुकानदार संघटने चे सर्व पदाधिकार व दुकानदार जिला परिषद सर्कल मधिल पदाधिकारी आजुबाजुच्या गावातील मंडळी गावातील गावकरी ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत जि.प.प्राथमिक शाळा कामळज वस्ती तालुक्यात तृतीय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । भारत वानरे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२' अंतर्गत मुदखेड तालुक्यातून जिल्हा परिषद प्राथमिक कामळज वस्ती शाळेने तृतीय क्रमांक पटकावला. या उपक्रमांतर्गत प्रामुख्याने वृक्षारोपण, रंगरंगोटी, निवडणूक व साक्षरता कार्यक्रम प्रसार, पर्यावरण विषयक जागृती, क्रीडांगण व क्रीडा सुविधा, परसबाग, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्यसेवा, ग्रंथालय, स्वच्छता विषयी स्थिती, तंबाखू मुक्त शाळा, सुसज्ज इमारत व उत्कृष्ट गुणवत्ता या सर्व बाबी असल्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कामळज वस्ती या शाळेने तृतीय क्रमांक मिळून एक



लाख रुपयाचे बक्षीस मिळवले आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक श्री रामदास कांबळे सहशिक्षक श्री देवराव झुंजारे सरपंच श्रीमती दिपाली पाटील खानसोळे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री नागोराव कोकरे व उपाध्यक्ष श्री केशव कोकरे या सर्वांचे पंचायत समिती मुदखेडचे गटशिक्षणाधिकारी रुस्तुम आडे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी सुरेश पाटील, केंद्रप्रमुख संतोष सुजलेगावकर, केंद्रप्रमुख लक्ष्मण मगरे, सदानंद कुलकर्णी, उत्तम ताटे, बाबू कोकरे, सौ वंदना कोकरे यासह गावकरी तसेच शिक्षणप्रेमी जनतेने भरभरून कौतुक केले व अभिनंदन केले.

## देगलुर येथील प्रसिद्ध डॉ उत्तम इंगोले यांना स्विमिंग स्पर्धेत सन्मान चिन्ह

### आय.एम.ए.एम.एस महा स्पोर्टस २०२४ स्विमिंग स्पर्धा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

देगलुर तालुक्यातील प्रसिद्ध असलेले डॉ उत्तम इंगोले यांना २०२४ चा २५ रोजी शुक्रवार नांदेड येथील शांताराम सगणे जलतरणीका येथे इंडियन मेडिकल असोसिएशन नांदेड यांनी महा स्पोर्ट स्विमिंग स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेत देगलूर येथील डॉ. जनार्दन भूमी ५० मीटर बटरफ्लाय , ५० मीटर फ्रीस्टाइल ५० मीटर बॅक स्ट्रोक, २०००मीटर मिक्स अस बरोबर मिळवले. डॉ. विनायक मुंडे ५० मीटर बॅक स्ट्रोक, ५० मीटर फ्री स्टाइल असे दोन मेडल जिंकले. डॉक्टर उत्तम इंगोले बॅक स्ट्रोक ५० मीटर ,बेस्ट ऑफ ५० मीटर असे दोन मेडल जिंकले. आणि डॉ. सुरेंद्र अलुरकर ब्रेस्ट्रो ५० मीटर मध्ये एक मेडल जिंकले.अशा प्रकारे देगलूर येथील चारही डॉक्टरांनी या स्पर्धेमध्ये बक्षीस घेऊन देगलूर चा नाव लौकीक महाराष्ट्रभर उंचावलं आहे. या यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ वर्ग पत्रकार सर्वांनी अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.




## आदर्श विद्यालयात दीपोत्सव उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली द्वारा संचालित आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर सिंदखेड राजा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिवाळीचे महत्व विशद करणारा दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.एस.टी.मोरे प्रमुख अतिथी श्री.एस.टी.चौधरी होते. प्रमुख वक्ते म्हणून शाळेतील शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या.

सर्वप्रथम विद्येची देवता माता सरस्वती



तसेच माता लक्ष्मी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दिवाळीच्या विविध दिवसांची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. त्यामध्ये श्री. पी.एम मापारी - वसुबारस,श्री.आर.जे.मेहत्रे - धनत्रयोदशी, श्री.एम.एस.दांडगे - नरकचतुर्थी, कु.के.एस.गोरे - लक्ष्मीपूजन, श्री.एस.बी.मैंद - पाडवा, कु.जेबी.माने - भाऊबीज अशा प्रकारे दिवाळीच्या प्रत्येक दिवसाचे महत्त्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध कथांच्या आधारे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.एस.एम भुतेकर यांनी केले तर आभार श्री.एस.एस भुतेकर यांनी मानले. यावेळी शाळेत सर्व वर्गात रांगोळी व दिवे दिवे लाऊन सजावट करण्यात आली. सदर दीपोत्सवात शाळेतील सर्व शिक्षक वृंद व प्रत्येक वर्गातील विद्यार्थी आनंदाने सहभागी झाले होते.

## एल्गार बैठकीला हजारोच्या संख्येने उपस्थित रहा-नागवंशी संघपाल पनाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

शिव, फुले, शाहू ,आंबेडकर, मौलाना आझाद, चळवळीच्या तमाम माझ्या बंधू-भगिनींना तथा माझ्यावर प्रेम करणाऱ्या मेहकर-लोणार विधानसभा क्षेत्रातील, माझ्यावर प्रेम करणाऱ्या व शुभचिंतकांना आवाहन करण्यात येते की. होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आपल्या सोबत चर्चा करून मेहकर-लोणार विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्याला एल्गार पुकारायचा आहे. तरी तमाम जनतेने हजारोंच्या संख्येने सुलतानपूर येथे दि.२७/१०/२०२४ ठिक दुपारी



१२: वाजता उपस्थित राहावे ही विनंती आपला हक्काचा माणूस आंदोलन सम्राट, नागवंशी संघपाल पनाड मेहकर लोणार विधानसभा नेते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904